**नियमित दिवाणी दावा क्र.८२/२००६ मधील नि.१५२ खालील आदेश**
**सुभद्रा विलास चव्हाण वगैरे वि. जगन्नाथ यशवंत चव्हाण वगैरे**
**CNR NO.MHST050004212006**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १६ व आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

प्रस्तुतचा दावा वादींनी वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दि.१५.०१.२०२१ रोजी मे.कोर्टात पुरसीस देवून या दाव्यातील प्रतिवादी क्र.६,७,९, १६,१७,२०,२६,२९,३१,३३ हे प्रतिवादी मयत झालेबाबत तसेच प्रतिवादी क्र.२५ हे परागंदा असलेचे कळविले आहे. या प्रतिवादींचेकडून वादींची काही एक मागणी नाही. तसेच ते वादींचे वंशावळीतील सुध्दा नाहीत. मात्र ७/१२ वर त्यांची नावे दाखल असलेने वादींनी त्यांना सामील केलेले आहे. वादींचे मयत प्रतिवादींचेकडून तसेच प्रतिवादी क्र.१०,१९,२५,२८,३२ यांचेकडून कोणतीही मागणी नाही तसेच वाटपाचे वेळेस या प्रतिवादींचे ७/१२ वरील नावामुळे कोणताही व्यत्यय येणार नाही. त्यामुळे या मयतांची नावे व प्रतिवादी क्र. १०,१९,२५,२८,३२ यांचे नावे दाव्यातून कमी करणेत यावी. त्यामुळे दाव्याचे मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून वादींनी अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांनी सदर अर्जास त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

५. मूळ दावा हा वाटपाकरीता दाखल केलेला होता. दि.०३.१२.२०१४

रोजी दावा अंशत: मंजूर करण्यात आला. सदर न्यायनिर्णयाविरुध्द अपिल दाखल करण्यात आले. रे.दि.अ.क्र.५/२०१५ मध्ये मा. जिल्हा न्यायालयाने आवश्यक पक्षकारांना सामील करुन घेण्यात यावे असे निर्देश देवून दावा पुन्हा फैलावर घेण्याकरीता पाठविला. त्यानंतर वादीने दि.३०.११.२०१८ रोजी दुरुस्तीचा अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र.६ ते ३३ यांना दाव्यात समाविष्ट केले.

६. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ६,७,९, १६,१७,२०,२६,२५,२९,३१,३३,१०,१९,२८,३२ यांना या दाव्याचे कामी सामील केलेले आहे. परंतु नमूद प्रतिवादी हे वादी प्रतिवादी यांचे वंशावळीमध्ये नाहीत. तसेच त्यांच्या विरुध्द कोणतीही दादही मागणेची नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी यांना दाव्यातून कमी करण्याची विनंती केली आहे.

७. वादीने दाखल केलेली वंशावळ पाहता वर नमूद प्रतिवादी हे वादी यांच्या वंशावळीमध्ये नाहीत. तसेच वादीची या नमूद प्रतिवादींविरुध्द कोणीतीही दाद नाही. वर नमूद प्रतिवादींची केवळ ७/१२ मध्ये नावे नोंद आहेत. अर्जातील कथनांचा विचार करता वर नमूद प्रतिवादी हे आवश्यक पक्षकार नसलेने वादीचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. अर्ज मंजूर झाल्यानंतर दावा गुणदोषावर चालण्यास मदतच होणार आहे. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्यामुळे सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. त्यामुळे वादींचा अर्ज मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबत प्रतिवादी हे कॉस्ट मिळणेस पात्र आहेत. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी प्रतिवादी यांना र.रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे फक्त) कॉस्ट देणेचे आहे.

३. वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करावा व दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.02.24 11:08:30 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – २३/०२/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड